दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष-४

अंक - ४७

epaper.diwanews.com


www.diwanews.com ♦ सोमवार,२३ जून २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669

**गौरी गणपतीसाठी रेल्वेने कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी ठाणे रेल्वे स्थानकात दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या...**

( पान ४ वाचा)

## दिवा रेल्वे स्थानकातील गर्दी आणि प्रवाशांच्या समस्या समजून घेण्यासाठी रेल्वे अधिकाऱ्यांनी सकाळी दिव्यातून प्रवास करावा, रेल्वेला प्रश्नांची जाणीव होईल...

# दिवा लोकल सोडण्याची रेल्वे प्रशासनाची इच्छाशक्ती आहे काय?



दिवा न्यूज /सडेतोड

सुहास खंडागळे

**दिवा रेल्वे स्थानकातून** प्रवास करणऱ्यांच्या समस्या रेल्वेला समजून घ्यायच्या असतील तर रेल्वेच्या बड्या अधिकाऱ्यांनी सकाळच्या वेळेस दिवा सीएसएमटी प्रवास दिवा स्थानकातून करायला हवा.सकाळी दहाच्या ऑफिसला पोहचण्यासाठी येथील प्रवासी किती ट्रेन सोडतात आणि ज्या ट्रेनने प्रवास करतात त्या ट्रेनने कसा प्रवास करतात याचा अनुभव रेल्वे अधिकऱ्यांनी घ्यायला हवा.चुकून वेळेत ट्रेन या अधिकऱ्याला पकडता आली तर आत मधील गर्दीचे वास्तव दर्शन त्याला होईल.समस्या कळतील आणि जनतेला न्याय मिळण्यास मदत होईल.रेल्वे प्रशासन असा अनोखा प्रयोग करेल काय हा प्रश्न आहे. दिवा लोकल सुरू करण्याची प्रवाशांची मागणी अद्याप पूर्ण झालेली नाही.एखादा अपघात झाला की त्यादृष्टीने फक्त चर्चा होतात. मात्र दर दिवशी प्रचंड गर्दीतून लोकल प्रवासाच्या नरक यातना भोगणऱ्या रेल्वे प्रवाशांचे दु:ख रेल्वे प्रशासनाला दिसत नाही. याबाबत बोलताना दिवा रेल्वे संघर्ष समितीचे अध्यक्ष विजय भोईर सांगतात, जर तुम्ही घाटकोपर सारख्या रेल्वे स्टेशन वरून होम फलाट नसताना सीएसएमटीच्या दिशेने लोकल सोडता,तर मग जंक्शन असणऱ्या दिवा रेल्वे स्थानकातून सकाळच्या वेळेस सीएसएमटी वरून येणारी लोकल दोन मिनिटाच्या काळासाठी सुरू करण्यास हरकत काय? तर सध्या दिवा रेल्वे स्थानकात सकाळच्या वेळेस सीएसएमटीच्या दिशेने जाणऱ्या लोकल या त्यांच्या नियमित वेळेने न धावल्याचा फटका देखील प्रवाशांना बसतो आणि कमी कालावधीत फलाट प्रवाशांनी भरून जातो.उशिरा आलेल्याना लोकलमध्ये चढण्यास प्रवाशांची झुंबड उडते. आधीच कल्याणकडून भरून येणऱ्या लोकांमुळे दिव्यातील रेल्वे प्रवाशांना आत मध्ये जाता येत नाही,असं याबाबत बोलताना रेल्वे प्रवासी किरण जाधव सांगतात.

**दिवा रेल्वे जंक्शन येथून** फलाट क्रमांक सहा,सात,आठ इथे प्रवाशांना अनेक असुविधा भेडसावतात. या ठिकाणी शौचालयाची सुविधा नाही. शौचालय लोकांच्या सुविधेसाठी निर्माण करणे रेल्वेचे जबाबदारी असतानाही मूलभूत पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष आहे.दिवा स्टेशनच्या मुख्य रोड वरून येणारे प्रवासी यांना कोकणात जाणाऱ्या ट्रेन पकडण्यासाठी स्थानकाकडील पहिल्या पादचारी पुलावरून जाता येत नाही. सकाळच्या वेळेस झुंडशाहीने कर्जत,कसारा, डोंबिवली येथून ग्रुप करून येणारे प्रवासी दिव्यासारख्या रेल्वे स्थानकात त्यांच्या ग्रुपचा व्यक्ती सोडून अन्य प्रवाशांना घुसू देत नाहीत.ही देखील गंभीर समस्या असून यामुळेही अनेक प्रवाशांना दरवाज्यातून आज जाता येत नाही.सकाळच्या गर्दीचा नियोजन करण्याचा प्रयत्न रेल्वे करत नाही असं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सचिव प्रशांत गावडे दिव्यातील रेल्वे समस्यांवर बोलताना सांगतात. एकंदरीत दिवा रेल्वे स्थानकातून सकाळच्या वेळेस कामासाठी घरातून बाहेर पडणऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील रेल्वे प्रवाशांना रेल्वे प्रवासाच्या नावाखाली प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो, ही वस्तुस्थिती आहे.या भागातून मुंबईच्या दिशेने प्रवासाचा दुसरा सक्षम पर्याय नसल्याने नागरिकांचा गर्दीतून जाण्याचा नाईलाज होतो.मागील पाच वर्षात स्थानक सुधारण्याचा कार्यक्रम रेल्वेने हाती घेतला. रेल्वे स्थानकाची रंगरंगोटी आणि सुशोभीकरण यावर भर दिला गेला. मात्र दुसरीकडे रेल्वे प्रवाशांना लोकल सेवा अधिक जलद आणि जादा गाड्या सोडण्यात मात्र रेल्वे प्रशासन अपयशी ठरले.दिवा शहरात मागील काही वर्षात वाढलेली प्रवासी संख्या लक्षात घेतली, तर या ठिकाणाहून स्वतंत्र सीएसएमटी लोकल सोडणे आवश्यक होते.मात्र अद्याप प्रवाशांची ही मागणी पूर्ण झालेली नाही. घाटकोपर सारख्या रेल्वे स्थानकातून सकाळच्या वेळेस सीएसएमटी साठी लोकल सोडल्या जातात. दिव्यातून लोकल सोडण्यासाठी मात्र होम पलाट हवा असं कारण रेल्वे प्रशासन देत. दोन ठिकाणच्या दोन रेल्वे स्थानकातील प्रवाशांसाठी वेगवेगळे नियम रेल्वे प्रशासनाकडून कसे काय लावले जातात?हा प्रश्न या ठिकाणी महत्त्वाचा आहे. घाटकोपर मध्ये राहणऱ्या रेल्वे प्रवाशांचा विचार ज्या दृष्टिकोनातून रेल्वे करते,त्याच दृष्टिकोनातून दिवा शहरात राहणऱ्या रेल्वे प्रवाशांचा विचार का केला जात नाही हाही प्रश्न या ठिकाणी महत्त्वाचा आहे. सीएसएमटी वरून येणारी लोकल दिवा शहरातून फलाट क्रमांक दोन वरून उपलब्ध असणाऱ्या वेळेमध्ये सकाळी आठ साडेआठच्या दरम्यान सोडली गेल्यास त्याचा लाभ दिवा शहरातील प्रवाशांबरोबरच मुंब्रा,कळवा येथील प्रवाशांना ही होईल. या भागातील प्रचंड गर्दीच विभाजन होईल. मात्र रेल्वे प्रशासनाला प्रश्न सोडवण्याची मानसिकता दिसत नाही हेच यातून दिसते.दिव्यात होम फलाट जागेच्या प्रश्नामुळे रखडला आहे.तो सुटेल आणि मग दिव्यातून लोकल सोडू हा विचार रेल्वे प्रवाशांना न्याय देणारा ठरणार नाही.

**दुसरीकडे कर्जत कसारावरून** येणाऱ्या जलद लोकल दिव्यात थांबतात.मात्र या लोकल आधीच भरलेल्या असतात.परिणामी त्याचा फायदा हा दिव्यातील रेल्वे प्रवाशांना तितकासा होत नाही.दिवा शहरातून लोकल सोडली जात नसल्याने दिव्यातून डोंबिवलीच्या दिशेने जाणारे रिटर्न प्रवासी डोंबिवलीतील प्रवाशांना त्रासदायक ठरतात असं डोंबिवलीतील प्रवाशांचं म्हणणं असतं.यातून रेल्वे प्रवाशांमध्ये वाद होत असल्याचे विजय भोईर सांगतात.रेल्वे प्रशासन दोन स्थानकातील प्रवाशांमध्ये हा वाद निर्माण करते का?हाही प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो.

**लोकांना बसायला जागा** मिळत नसल्याने ते रिटर्न प्रवास करून आपल्या कामावर जाण्याचा प्रयत्न करतात.सर्वसामान्य जनता रेल्वेच्या आडमुठ्या धोरणासमोर हदबल आहे.जसा मार्ग मिळेल तसा मार्ग प्रवासी शोधतात.यात रिटर्न प्रवास असतो किंवा मग जीव धोक्यात घालून दरवाजात लटकणे असो.रेल्वे कर्मचऱ्यांसाठी स्वतंत्र लोकल सुटत असल्याने प्रवाशांचे दु:ख त्यांना कळणार नाही.रेल्वेला हे मुद्दे लक्षात येत नाहीत याच आश्चर्य आहे. कळवा, मुंब्रा,दिवा हे शहर सर्वसामान्य नोकरदार वर्गाची शहर आहेत.सकाळच्या वेळेस रेल्वेने प्रवास करणारे प्रवासी या ठिकाणी आहेत.प्रवासाची अन्य मुबलक साधन या तिन्ही शहरांना नाहीत,याचा विचार करून रेल्वेने स्वतंत्र लोकल दिव्यातून सोडायला हवी. त्यासाठी होम फलाटचा हट्ट सोडायला हवा. सकाळच्या वेळेस किमान चार लोकल दिवा शहरातून सुटल्यास त्याचा फायदा त्या संपूर्ण भागातील रेल्वेच्या गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी होईल. यासाठी प्रचंड इच्छाशक्तीची गरज आहे.ही इच्छाशक्ती रेल्वे दाखवणार नसेल तर दिवा, मुंब्रा कळवा रेल्वे स्थानकातून प्रवाशांचा जीवावर बेतणारा प्रवास होण्यास रेल्वेचे धोरण जबाबदार आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

## मनमानी करणाऱ्या फेरीवाल्यांपासून नागरिकांना दिलासा देण्यासाठी ठाणे महापालिकेने दिव्यात फेरीवाला क्षेत्राचे बोर्ड लावावेत-ज्योती पाटील

**दिवा:**-ठाणे महानगरपालिकेने दिवा शहरात फेरीवाल्यांच्या मनमानी कारभाराला आळा घालण्यासाठी फेरीवाला क्षेत्र व ना फेरीवाला क्षेत्र नावाचे बोर्ड रस्त्याच्या बाजूला लावावेत अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाच्या दिवा शहर संघटिका ज्योती पाटील यांनी पालिका आयुक्तांकडे केली आहे.

दिवा शहर ठाणे महानगरपालिका क्षेत्रात असूनही महापालिकेच्या सोयी सुविधा दिवा शहरात नागरिकांना मिळत नाही. एकीकडे पाणी समस्या तर दुसरीकडे आरोग्य समस्येकडेही पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. यातच आता मनमानी पद्धतीने रस्त्याच्या कडेला बसणाऱ्या फेरीवाल्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून चालणे ही अवघड झाले आहे. सर्वच रस्ते फेरीवाल्यांनी व्यापल्याने नागरिकांना रस्त्याच्या मधून चालावे लागते. यामुळे अनेक वेळा अपघात घडण्याची शक्यता असते. दिवा शहरातील मुख्य रस्ते हे फेरीवाल्यांनी व्यापल्याने शहराने बकाल स्वरूप धारण केले आहे.कचऱ्याचे व घाणीचेही साम्राज्य रस्त्याच्या कडेला पाहायला मिळते. या गोष्टी लक्षात घेऊन महापालिकेने दिवा शहरातील मुख्य रस्त्यांवर ना फेरीवाला क्षेत्र व फेरीवाल्यांना बसण्यासाठी अंतर्गत रस्त्यांना फेरीवाला क्षेत्र अशा स्वरूपाचे बोर्ड दिवा शहरात लावावेत जेणेकरून फेरीवाले कशाही पद्धतीने कुठल्याही रस्त्यावर बसणार नाहीत, अशी भूमिका शिवसेना ठाकरे गटाच्या महिला शहर संघटिका ज्योती पाटील यांनी पालिका आयुक्तांना केलेल्या ट्विट मधून मांडली आहे. दिवा शहरातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी महापालिका आयुक्तांनी स्वत: लक्ष घालून दिव्यातील नागरिकांना दिलासा द्यावा अशी विनंती ही ज्योती पाटील यांनी केली आहे.

## दूध भेसळ रोखण्यासाठी लवकरच नवा कायदा - मंत्री अतुल सावे

**मुंबई:**- राज्यात दूध भेसळ रोखण्यासाठी लवकरच नवा कायदा अस्तित्वात येईल, अशी माहिती दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांनी दिली.मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली दुग्धविकास विभागाच्या १५० दिवसांच्या आराखड्याच्या अनुषंगाने मंत्रालयात बैठक घेण्यात आली. यावेळी दुग्धविकास विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन. महानंदाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर यांच्यासह राज्यातील प्रमुख दूध संघांचे प्रतिनिधी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.या बैठकीत दूध संघाच्या प्रतिनिधींनी अनेक सूचना केल्या. यामध्ये राज्यात दुधाला समान दर, एक राज्य एक ब्रँड, एक जिल्हा एक दूधसंघ तसेच एक गाव एक दूध संस्था स्थापन करण्याची मागणी प्रतिनिधिंनी केली. त्यावर सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे मंत्री अतुल सावे यांनी यावेळी सांगितले.

मुंबईतील आरे स्टॉलचे अत्याधुनिकरण करण्यात येईल. दिवसातून दोन वेळा दूध संकलन करण्याची मागणी पूर्ण करण्याबाबत विचार करण्यात येईल, असे मंत्री श्री. सावे यांनी सांगितले.

दूध संकलनासाठी शेतकरी प्रोड्युसर कंपन्याची मदत घेण्याबाबत निर्णय घेतला जाईल. महानंदाद्वारे अधिकाधिक दूध संकलन वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याची सूचना मंत्री श्री. सावे यांनी दिली.

# मोफत उच्च शिक्षण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे निर्देश

**मुंबई :**- शासकीय, अनुदानित, अंशतः अनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने तसेच सार्वजनिक व शासकीय अभिमत विद्यापीठांमध्ये शिक्षण घेत असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थिनींना १०० टक्के शिक्षण व परीक्षा शुल्क सवलत दिली जात आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करावी, एकही मुलगी या योजनेपासून वंचित राहणार नाही, याची सर्व महाविद्यालयांनी गांभिर्याने नोंद घ्यावी असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले.

मंत्रालयात मुलींसाठी मोफत उच्च शिक्षण योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी.वेणूगोपाल रेड्डी, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर,उपसचिव खोरगडे व संबंधित अधिकारी उपस्थित होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या पात्र विद्यार्थिनींकडून प्रवेशावेळी कोणतेही शुल्क आकारले जाऊ नये,मागील वर्षी संस्थांनी शुल्क आकारले असल्यास, ते परत करण्याचे स्पष्ट निर्देशही श्री.पाटील यांनी यावेळी दिले.

शिष्यवृत्ती रक्कम थेट संस्थेच्या खात्यात आणि परीक्षा शुल्क विद्यार्थिनींच्या आधार संलग्नित खात्यावर जमा केली जाते.

तंत्रशिक्षण संचालनालयाने हेल्पलाइन व मदतकक्ष कार्यान्वित केले असून, शुल्क आकारणीविषयीच्या सर्व तक्रारींचे तात्काळ निराकरण करण्यात येत आहे. यासाठी विशेष नोडल अधिकारी नियुक्ती करण्यात येत असल्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत, दि. १६ जून २०२५ पर्यंत तंत्र शिक्षणकडून १लाख ३ हजार ६१५ मुलींना ?७८४.४६ कोटी रुपयांचा थेट लाभ देण्यात आला आहे.

याशिवाय, दि. १६ जून २०२५ पर्यंत उच्च शिक्षणकडून १लाख ३२ हजार १८८ अर्ज प्राप्त, त्यापैकी ६१ हजार ५२६ विद्यार्थिनींना ?५५.८३ कोटी रक्कम वितरित करण्यात आली असून, उर्वरित अर्जांची पडताळणी अंतिम टप्प्यात आहे. योजनेचा लाभ केवळ पदविका अभ्यासक्रमापुरता मर्यादित नसून, यांसारख्या पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्येही विद्यार्थिनींना १०० टक्के शुल्क सवलतीचा लाभ दिला जात असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## मराठी भाषा अनिवार्य; हिंदीसह इतर भारतीय भाषा ऐच्छिक - शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे

**मुंबई :**- राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये यापुढे इयत्ता पहिली ते पाचवीसाठी हिंदी ही सर्वसाधारणपणे तृतीय भाषा असेल. परंतु ज्या विद्यार्थ्यांनी हिंदी या तृतीय भाषेऐवजी इतर भारतीय भाषांपैकी एक भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्याची इच्छा दर्शविल्यास त्या विद्यार्थ्यांना ती भाषा तृतीय भाषा म्हणून शिकण्यास मान्यता देण्यात येईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी स्पष्ट केले आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले, हिंदी ऐवजी इतर भाषा ही तृतीय भाषा म्हणून शिकण्यास इच्छा दर्शविणाऱ्या विद्यार्थ्यांची त्यांच्या शाळेतील इयत्तानिहाय संख्या ही किमान २० इतकी असणे आवश्यक राहील. हिंदी ऐवजी इतर तृतीय भाषा शिकण्याकरिता उपरोक्तप्रमाणे विहित किमान २० विद्यार्थ्यांनी इच्छा दर्शविल्यास, त्या भाषेच्या अध्यापनाकरिता शिक्षक उपलब्ध करून देण्यात येईल अन्यथा सदर भाषा ही ऑनलाइन पद्धतीने शिकविण्यात येईल.

सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी अनिवार्य भाषा असेल. ज्या शाळा मराठी भाषा शिकविणार नाहीत, त्यांच्यावर कारवाई केली जाईल. यासंबंधीचे सर्व नियोजन हे शालेय शिक्षण आयुक्त यांच्यास्तरावरून तत्काळ करण्यात येईल. मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळांव्यतिरिक्त अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीसाठी माध्यम भाषा, मराठी व इंग्रजी अशा तीन भाषा अभ्यासल्या जातील. इयत्ता सहावी ते दहावीकरिता भाषा धोरण हे राज्य अभ्यासक्रम आराखडा - शालेय शिक्षण प्रमाणे असेल, असेही मंत्री श्री.भुसे यांनी स्पष्ट केले आहे. राज्य अभ्यासक्रम आराखडा शालेय शिक्षण २०२४ नुसार इयत्ता पहिली ते पाचवीसाठी मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी भाषेबाबतच्या १६ एप्रिल २०२५ च्या शासन निर्णयामध्ये वरीलप्रमाणे बदल करण्यात आला असल्याचे शालेय शिक्षण विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५

संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाची ३ ३ अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई

**ठाणे** :- उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आणि प्रभाग समितीच्या बीट निरिक्षकांनी केलेल्या पाहणीत आढळलेल्या ३३ अनधिकृत बांधकामांवर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई केली. ही कारवाई १९ आणि २० जून रोजी करण्यात आली. यात पूर्ण इमारत, प्लिंथ, कॉलम, स्लॅब, वाढीव बांधकाम याप्रकारच्या बांधकामांचा समावेश आहे. यापुढेही अनधिकृत बांधकामांच्या निष्कासनाची प्रभाग समितीनिहाय कारवाई सुरूच राहणार आहे.

अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी प्रत्येक प्रभाग समिती क्षेत्रात सहाय्यक आयुक्त यांच्या नेतृत्वात विशेष पथकाची स्थापना केली आहे. या पथकांनी आपापल्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबतच्या तक्रारी आणि प्रत्यक्ष पाहणी यांच्या आधारे तत्काळ कारवाई करण्याचे आदेश आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. त्यानुसार, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. तळ मजला अधिक चार मजले, सीआरझेड क्षेत्रात उभारण्यात आलेले भंगाराचे गोडावून, व्याप्त अनधिकृत इमारतीवरील वाढीव बांधकाम, प्लिंथ, दुकानातील वाढीव बांधकाम आदी वेगवेगळ्या तक्रारींनुसार ठाणे महापालिका क्षेत्रात १९ आणि २० जून रोजी झालेल्या कारवाईत एकूण ३३ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे यांनी दिली. ही कारवाई यानंतरही सुरूच राहणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या कारवाईमध्ये उपायुक्त (परिमंडळ), सर्व सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण आणि बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. या कारवाईसाठी पोकलेन, जेसीबी, गॅस कटर, ट्रॅक्टर ब्रेकर, मनुष्यबळ यांचा वापर करण्यात आला. पोलीस आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांच्या बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आल्याचेही पाटोळे यांनी सांगितले.

## पूर्ण इमारत, प्लिंथ, कॉलम, स्लॅब,वाढीव बांधकाम याप्रकारच्या बांधकामांवर झाली कारवाई सीआरझेडमधील भंगार गोडावूनही तोडले



**कारवाईच्या आकडेवारीचा तक्ता**

| | |
|---|---|
| नौपाडा-कोपरी | - ०२ |
| दिवा | - १२ |
| मुंब्रा | -०३ |
| कळवा | -०४ |
| उथळसर | - ०१ |
| माजिवडा-मानपाडा | - ०५ |
| वर्तक नगर | - ०२ |
| लोकमान्य नगर | - ०२ |
| वागळे इस्टेट | - ०२ |
| एकूण | - ३३ |

# बुलेट ट्रेनसह विविध प्रकल्पांचा घेतला आढावा


# पालघर जिल्ह्याच्या विकासासाठी सर्व विकास प्रकल्पांना गती द्या- वन मंत्री गणेश नाईक

**मुंबई :-** पालघर जिल्ह्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, नॅशनल हायस्पिड रेल कार्पोरेशन व मुंबई रेल्वे विकास महामंडळ आदी विविध यंत्रणांकडून राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांचा वन मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी आढावा घेतला. पालघर जिल्ह्याच्या विकासासाठी हे सर्व प्रकल्प महत्त्वाचे असून या प्रकल्पांच्या कामांना गती देण्यात यावी. यासाठी वन विभाग व जिल्हा प्रशासनाकडून सर्व सहकार्य केले जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच पालघर जिल्ह्याचा दौरा केला. त्यावेळी त्यांनी पालघर जिल्ह्याच्या विकासासाठी आग्रही भूमिका मांडली होती. त्या पार्श्वभूमीवर वन मंत्री तथा पालघरचे पालकमंत्री श्री. नाईक यांनी सह्याद्री अतिथीगृहात आढावा बैठक घेतली. त्यावेळी वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक तथा वन बल प्रमुख शोमिता बिश्वास, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास राव, श्री. रामाराव, मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुद्गल, पालघरच्या जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, वसई विरार महापालिका आयुक्त अनिल पवार, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक नरेश झिरमुरे, उपसचिव विवेक होशिंग आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी विविध यंत्रणांनी पालघर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पांची माहिती दिली. यामध्ये सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, बाह्यरस्ते विकास योजना, पालघर जिल्ह्यातील विकासकामे, सफाळे/केळवा/माहिम विकास केंद्रे, पालघर विक्रमगड मार्गे समृद्धी महामार्गाला जोडणारा रस्ता, विरार अलिबाग मल्टिमोडल कॉरिडॉर, मुंबई अहादाबाद बुलेट ट्रेन, एमयूटीपी ३ अंतर्गत करण्यात येणारे रेल्वेची कामे आदींचा समावेश होता. वाढवण बंदर, समृद्धी महामार्ग व बुलेट ट्रेन अशा प्रकल्पांमुळे पालघर जिल्ह्याचा चेहरा मोहरा बदलणार आहे. याबरोबरच इतरही प्रकल्प जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी महत्त्वाचे आहेत. त्यामुळे या प्रकल्पांना वन मंत्री म्हणून तसेच जिल्ह्याचा पालकमंत्री म्हणून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येणार असल्याचे श्री. नाईक यांनी यावेळी सांगितले.

# दिव्यात नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांना रूम न देणाऱ्या बिल्डरवर कारवाई करा, अन्यथा मनसे स्टाईल धडा शिकवू !

## मनसेचे प्रकाश पाटील यांचा इशारा

**दिवा:**-दिवा शहरात काही बांधकाम व्यवसायिक हे सर्वसामान्य जनतेची पिळवणूक करत असून मनसेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जनता दरबारात काही नागरिकांनी बांधकाम व्यवसायिकांनी पैसे घेऊनही घर न दिल्याच्या तक्रारी मनसेचे प्रकाश पाटील यांच्याकडे केल्या. या तक्रारीची गंभीर दखल घेत प्रकाश पाटील यांनी पालिका अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष व संबंधित विकासकाशी फोनवर बोलून यावर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली नागरिकांना त्यांची घरे अथवा रक्कम परत न केल्यास मनसे स्टाईल हे प्रकरण हाताळले जाईल असा इशाराही प्रकाश पाटील यांनी दिला आहे. प्रकाश पाटील यांनी बाधित नागरिकांना सोबत घेऊन नुकतीच दिवा प्रभाग समितीतील



अधिकाऱ्यांची भेट घेतली व संबंधित बांधकाम व्यवसायिकांवर कारवाईची मागणी केली. नागरिकांची फसवणूक करणारे बांधकाम व्यावसायिक दिवा शहराचे नाव खराब करत असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.नागरिकांकडून रूमचे पैसे घेतल्यानंतर त्यांना रूम न देण्याऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणीच प्रकाश पाटील यांनी केली आहे.

# आयुष्मान कार्ड झालेत उपयोगशून्य ,सरसकट सर्वच आजारांवर आयुष्मान योजनेचा लाभ मिळावा, संगम डोंगरे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**ठाणे** :- गोरगरीब रूग्णांना मोफत उपचार व्हावेत, यासाठी आयुष्मान भारत ही योजना लागू करण्यात आली आहे. मात्र, या योजनेत ठराविक आजारांवरच उपचार होत आहेत. परिणामी, गोरगरीब रूग्णांना इतर उपचार मिळत नाहीत. त्यामुळेच आयुष्मान भारत योजनेचा फेरविचार करून सर्वच व्याधींसाठी ही योजना राबवावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संगम डोंगरे यांनी मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनात केली आहे.

डोंगरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनानुसार, आयुष्मान कार्ड ,प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व ज्योतिबा फुले आरोग्य योजना मध्ये रुग्णांना बरेचसे अडथळे येतात. खासगी रूग्णालयात गेल्यानंतर संबंधित आजारांवर उपचार या योजनेत होणार नाहीत; फक्त अमूक एका आजारावर उपचार होतील, असे सांगण्यात येते. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना होणारे आजार ताप, सर्दी ,डेंग्यू ,खोकला, न्युमोनिया, मलेरिया, टायफॉईड, कावीळ, गर्भपिशवीची शस्त्रक्रिया , बाळंतपण सिझेरियन , जुलाब, त्याचबरोबर हर्निया हायड्रोसील अपेंडिक्स आदी आजारांवर खासगी रूग्णालयात उपचार होत नाहीत. अनेकदा गोरगरीब रूग्णांना याच आजारावर उपचाराची गरज असते. हृदयविकारासारख्या मोठ्या शस्त्रक्रियेवरील उपचाराची मोजक्या



लोकांना गरज असते. हृदय संबधित मोठे उपचार होत असले तरी, त्यानंतरच्या उपचाराची तजवीज आयुष्यमान भारतमध्ये करण्यात आलेली नाही. ठाण्यातील एका वृद्धेला हृदयविकाराच्या उपचारासाठी आवश्यक असलेले रक्त पातळ करण्याचे पन्नास हजारांचे इंजेक्शन आयुष्मान भारत योजनेतून न मिळाल्याने तिचा मृत्यू झाला आहे. अशा अनेक घटना दररोज घडत असतात. एकंदर परिस्थितीत, आयुष्यमान कार्ड हे फक्त नाव पुरते कार्ड असून त्याचा उपयोग सर्वसामान्यांना होत नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळेच कोणत्याही प्रकारचा आजार असेल त्याचे उपचार सर्वच आरोग्यदायी योजनांतून व्हायला हवेत. जेणेकरून सर्वसामान्य लोकांना चांगले उपचार घेणे शक्य होणार आहे. त्यामुळेच आयुष्मान भारत, जोतिबा फुले आरोग्य योजना, प्रधानमंत्री योजना यांची व्याप्ती वाढवून सर्वच आजारांवर मोफत उपचार द्यावेत, अशी मागणी संगम डोंगरे यांनी केली आहे.

# आमदार संजय केळकर यांची शिधावाटप कार्यालयाला अचानक भेट....पीडब्लूडी अधिकाऱ्यांची धावपळ

**ठाणे**:- ठाण्याचे आमदार संजय केळकर यांनी ठाण्याच्या कोर्ट नाका येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील आवारात असलेल्या शिधावाटप कार्यालयाला अचानक भेट दिल्याने अधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ झाली.

आ. केळकर यांच्या मुळेच आय. एस. ओ. मानांकन मिळालेल्या या शिधावाटप कार्यालयात केलेल्या कामात पी डब्लू डि कडून दुर्लक्ष झाल्याने आ. केळकर यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने बोलावून घेतले. यावेळी रेशनिंग कार्यालयाच्या मुख्य अधिकारी चव्हाण मॅडम, पी डब्लू डि चे सचिन पाटिल व अधिकारी वर्ग उपस्थित होता.



आ. केळकर यांनी पी डब्लू डि च्या माध्यमातून पडझड झालेल्या या शिधावाटप कार्यालयाचा कायापालट केला होता. त्यामुळे या कार्यालयाला आय. एस. ओ. मानांकन मिळाले होते. आज या कार्यालयाला आ. केळकर यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली. यावेळी कामासाठी आलेल्या नागरिकांनी आ. केळकर यांची भेट घेऊन संवाद साधला. या कार्यालयात पाहणी करताना आ. केळकर यांना बाथरूम ची दुरावस्था दिसून आली तसेच पत्रा, स्लॅप ची वरून गळती सुरु आहे, या कार्यालयाच्या आवारात असलेले जांभळाचे झाड पडायला आले आहे. आणि ते कार्यालयावर केव्हाही पडू शकते शिवाय मधल्या वाटेवर पेव्हर ब्लॉक लागणे आवश्यक असल्याचे आ. केळकर यांच्या पाहणी दरम्यान निदर्शनास आले. परिसरात घाण दिसून आली. या सर्व बाबी पाहणी दरम्यान निदर्शनास आल्यावर आ. केळकर यांनी पी डब्लू डि अधिकाऱ्यांवर संताप व्यक्त केला. तातडीने ही सर्व कामे पूर्ण करावी अशा सूचना यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी अधिकाऱ्यांनी १० - १२ दिवसात कामे पूर्ण करणार असल्याचे आ. केळकर यांना सांगितले.

शिधावाटप कार्यालय हे पब्लिक प्लेस आहे. येथे नागरिकांची दररोज ये जा असते. त्यामुळे हे कार्यालय सुस्थितीत असणे आवश्यक आहे. पी डब्लू डि अधिकाऱ्यांनी लवकर काम पूर्ण होणार असल्याचे जरी सांगितले असले तरी मी पुन्हा या कार्यालयास भेट देणार असल्याचे आ. केळकर यांनी बोलताना सांगितले.

# शिक्षकांच्या खात्यात जमा होणार अर्जित रजा ठाणे जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांना लाभ

## अनिल बोरनारे यांच्या मागणीवरून शिक्षण उपसंचालकांचे आदेश

**ठाणे** :- सुट्टी काळात वरिष्ठ व निवडश्रेणी प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या शिक्षकांच्या खात्यात अर्जित रजा जमा होणार असून भाजप राज्य कार्यकारिणी निमंत्रित सदस्य व शिक्षक नेते अनिल बोरनारे यांच्या मागणीवरून ठाणे जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी आदेश निर्गमित केले आहे या निर्णयाचा फायदा ठाणे जिल्ह्यातील शेकडो प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना होणार आहे राज्यात जूनच्या पहिल्या आठवड्यात शिक्षकांचे वरिष्ठ व निवडश्रेणीचे प्रशिक्षण झाले या प्रशिक्षणात हजारो शिक्षक सहभागी झाले होते. दीर्घ सुट्टीच्या काळात प्रशिक्षण अथवा इतर कामासाठी शिक्षकांना बोलावल्यास त्या दिवसांची अर्जित रजांची नोंद शिक्षकांच्या सेवा पुस्तिकेत केली जाते तथापि अनेक ठिकाणी अशा नोंदी केल्या जात नसल्याच्या तक्रारी अनिल बोरनारे यांच्याकडे शिक्षकांनी केल्या होत्या यावर बोरनारे यांनी शिक्षण उपसंचालक यांना निवेदन देऊन शिक्षकांना अर्जित रजा मिळावी व तशा नोंदी करण्यात याव्यात अशी मागणी केली होती ही मागणी मान्य करीत शिक्षण उपसंचालकांनी व ठाणे शिक्षण अधिकाऱ्यांनी आदेश निर्गमित केले.

या आदेशात ज्या प्राथमिक/ माध्यमिक शिक्षकांनी वरिष्ठ वेतनश्रेणी/निवडश्रेणी सेवांतर्गत प्रशिक्षण (गृहपाठासह) पुर्ण केल्यामुळे त्यांना सुट्टी उपभोगण्यात प्रतिबंध झाला असेल त्यांच्या खाती अर्जित रजा जमा करण्याबाबत महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र. १६ (१८) (अ) मधील वरील नियमानुसार कार्यवाही करावीत असे आदेश दिल्याने या निर्णयाचा फायदा ठाणे जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयंतर्गत असणाऱ्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शेकडो शिक्षकांना होणार असल्याचे अनिल बोरनारे यांनी सांगितले.

# गौरी गणपतीसाठी रेल्वेने कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी ठाणे रेल्वे स्थानकात दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या

## खासदार नरेश म्हस्के यांच्या हस्ते उद्घाटन

**ठाणे** :- खासदार म्हणून निवडून आल्याच्या १ वर्षाच्या आतच नरेश म्हस्के यांनी रेल्वे विषयक अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. गेल्या ४ वर्षांपासून गणेशोत्सवासाठी कोकणात रेल्वेने जाणऱ्या चाकरमान्यांसाठी ठाणे रेल्वे स्थानकात तिकीटासाठी दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या सुरु कराव्यात ही प्रवासी संघटनेची मागणी प्रलंबित होती. खासदार नरेश म्हस्के यांनी पाठपुरावा केल्याने आजपासून या दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या सुरु झाल्या असून त्यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले.

गणेशोत्सव सुरु व्हायच्या तिन महिने आधीपासूनच मुंबई, ठाणे आणि उपनगरात स्थायिक झालेल्या चाकरमान्यांना कोकणात जाण्याचे वेध लागतात. कोकणात जाण्यासाठी रेल्वे प्रवास हा सुखकर असल्याने लाखो गणेशभक्त कोकण रेल्वेचा पर्याय निवडतात. मात्र अपुऱ्या आरक्षण खिडक्यांमुळे गणेशभक्तांची वेळ वाया जाते आणि रांगेत उभे राहून दमछाक होत होती. ही गैरसोय दूर व्हावी यासाठी प्रवासी संघटनने ठाणे रेल्वे स्थानकात कोकण रेल्वेच्या तिकीटासाठी दोन अतिरिक्त आरक्षण सुरु करण्याची मागणी केली होती. खासदार नरेश म्हस्के यांना प्रवाशांच्या प्रश्नांची जाणीव असल्याने अवघ्या काही दिवसातच ही मागणी त्यांनी मध्य रेल्वेकडून मान्य करुन घेतली.

२० जून २०२५ ते ५ जुलै २०२५ या दरम्यान ठाणे रेल्वे स्थानका जवळील मुख्य पोस्ट ऑफिस इमारती समोरील मुख्य आरक्षण केंद्र येथे या दोन अतिरिक्त आरक्षण खिडक्या (खिडकी क्रमांक ७ आणि ८) सुरु राहणार आहेत. आज २० जून रोजी खासदार नरेश म्हस्के यांनी या दोन खिडक्यांचे उद्घाटन केले.

यावेळी शिवसेना शहर प्रमुख हेमंत पवार, शहर संघटक भास्कर पाटील, सचिव बाळा गवस, रेल्वेचे अधिकारी रणजित झा, स्टेशन मास्तर केशव तावडे, प्रमिला देवगण, लकी कुमार, मिलिंद शिंदे, अनिल देवधर, दिनेश कुमार, संजीव कुलकर्णी, किरण नाक्ती, प्रकाश पायरे, रमाकांत पाटील, प्रशांत पाटील, संतोष बोडके, प्रितम रजपूत, निखिल बुजबुडे, अशोक कदम, विकास पाटील, मनोज गुप्ता, कुणाल पाटील, रुपेश पाटील, साहिल परब, मनिष साळवे, गणेश मुकादम, सचिन चांदुगडे, वसंत बोंडभर, बाळा केदार, प्रवासी संघटनेचे महेंद्र जाधव, सुरेश पालांडे, निलेश गवंडे, प्रदीप शितव, प्रदीप वारिसे, प्रविण बने, सुनिल बागुल, मिलिंद वायकर, शिवसैनिक आणि युवा सेना, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## कोकणवासिय आणि प्रवासी संघटनेने मानले खासदार नरेश म्हस्के यांचे आभार



# धानाचा साठा करण्यासाठी गोदामांची उभारणी करण्यात येणार, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके

**मुंबई** :- आदिवासी विकास महामंडळामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये आधारभूत खरेदी योजनेंतर्गत धान खरेदी करण्यात येते. आदिवासी क्षेत्रात शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला धान उघड्यावर राहून पावसाच्या दिवसांत भिजून खराब होऊ नये यासाठी गोदामांची उभारणी करण्यात येणार असून गोदामाच्या उभारणीमुळे हे नुकसान टाळता येणार असल्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी सांगितले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांच्या अध्यक्षतेखाली धान खरेदीच्या तक्रारीच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली. या बैठकीस मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेद सिंगल, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड तसेच संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके म्हणाले, महामंडळाद्वारे होणऱ्या या धान खरेदीमुळे आदिवासी बांधवांना उपजीविकेचे साधन निर्माण होते. धान साठवणुकीसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करणे आणि वाहतुकीसाठी वेळेवर नियोजन करणे यासाठी नविन कार्यपद्धती तयार करण्यात यावी. राज्यात धान खरेदी, साठवण आणि वाहतूक प्रक्रियेत येणऱ्या अडचणी सोडविण्यासाठी महसूल, कृषी, अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांनी एकत्रित समन्वयाने मानक कार्यप्रणाली तयार करावी. धान खरेदीला सुरुवात करण्यात आली असून शेतकऱ्यांनी एनईएमएल पोर्टलवर नजिकचे धान खरेदी केंद्र निवडून नोंदणी करावी. बोगस कागदपत्रे सादर करून धान खरेदीची रक्कम मिळविण्याचा प्रकार पडताळणीत आढळून आल्याने यासंदर्भात कडक कारवाई करण्यास सुरुवात झाली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# मुंबईत शिवसेनेचा उबाठा गटाला धक्का तीन माजी नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश

## गोवा राज्यातील पदाधिकाऱ्यांनी हाती घेतला धनुष्यबाण

**ठाणे**:- शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्याने प्रभावित होऊन आज मुंबईतील उबाठा गटाच्या तीन माजी नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याशिवाय ठाणे तसेच गोवा राज्यातील उबाठाच्या पदाधिकऱ्यांनी शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेतला.

ठाण्यातील मातोश्री स्व. गंगुबाई संभाजी शिंदे सभागृहात झालेल्या पक्ष प्रवेश सोहळ्यात आमदार दिलीप लांडे, शिवसेना सचिव राम रेपाळे उपस्थित होते. या पक्ष प्रवेशाने शिवसेना वर्धापन दिनीच मुंबईत उबाठाला मोठा धक्का बसला आहे.



आज उबाठाचे विभागप्रमुख आणि माजी नगरसेवक अजित भंडारी, शाखाप्रमुख संजय जंगम, प्रभाग क्रमांक १६१ चे उबाठा गटाचे माजी नगसेवक विजेंद्र शिंदे, प्रभाग क्रमांक १४० च्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नगरसेविका नादिया शेख आणि शिवसेना युवा सेना सचिव मोहसीन शेख यांनी आज उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. तसेच गोवा राज्यातील उबाठा गटाचे माजी राज्य प्रमुख उपेंद्र गावकर, काँग्रेस महासचिव काशिनाथ मयेकर, पाच तालुकाप्रमुख, एक शहर प्रमुख, विभागप्रमुख आणि कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेचा धनुष्यबाण हाती घेतला.

ठाण्यातील रामचंद्रनगर शाखेचे उबाठाचे उपविभागप्रमुख मोहन चव्हाण, विजय काते, विजय पवार, महादेव कदम, प्रवीण बामणे आणि अनेक उपशाखाप्रमुख, गटप्रमुख यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेत सामील झालेल्या लोकप्रतिनिधींच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. त्यांच्या प्रभागांतील विकास कामांना निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

# बांधकामे आणि विकासकांचा निष्काळजीपणा यामुळे डासनिर्मिती.. नियम मोडणारी बांधकामे बंद करा - आमदार संजय केळकर..

**ठाणे**:- ठाण्यात अनेक ठिकाणी अधिकृत आणि अनधिकृत बांधकामे सुरू असून आरोग्यविषयक नियमांची पायमल्ली विकासकांकडून होत असते. परिणामी शहरात डासांचे प्रमाण वाढत असून मलेरिया, डेंग्यूचे रुग्ण वाढत आहेत. डासनिर्मिती करणारी ही बांधकामे त्वरित बंद करण्यात यावीत, अशी मागणी आमदार संजय केळकर यांनी प्रशासक तथा आयुक्त डॉ.सौरभ राव यांच्याकडे केली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अधिकृत, अनधिकृत बांधकामे सुरू आहेत. विकासक आणि कंत्राटदार रॅबिट, बांधकाम साहित्य, कचरा, पाण्याच्या कुंड्या आदी गोष्टी अस्ताव्यस्त ठेवत असतात. अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग पडून असतात, त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरते, मोठ्या प्रमाणात डासनिर्मिती होते. आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. शाळा सुरू झाल्यामुळे अशा परिसरात असलेल्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना मलेरिया, डेंग्यूची लागण झाल्याचे प्रकार वाढत असल्याचे आमदार संजय केळकर यांनी पत्राद्वारे श्री.राव यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

या प्रकरणी आपण गांभीर्याने लक्ष देऊन प्रभागनिहाय प्रत्यक्ष पाहणी करावी, जे बांधकाम व्यावसायिक नियमांचा भंग करतात, त्यांची बांधकामे त्वरित थांबवावीत तसेच रस्त्याच्या कडेला असलेल्या अनधिवृत्त व्यवसाय करणाऱ्यांना देखील कडक समज देण्यात यावी, अशी मागणी श्री. केळकर यांनी केली आहे. जानेवारी ते १८ जून २०२५ या काळात ठाण्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयात २९९ मलेरियाच्या रुग्णांनी उपचार घेतल्याची नोंद आहे तर याच काळात १६४ डेंग्यूच्या रुग्णांनी उपचार घेतल्याची नोंद आहे. प्रत्यक्षात खासगी रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या मलेरिया आणि डेंग्यूच्या रुग्णांचे प्रमाण खूप मोठे आहे. एका शाळेत ४५ डेंग्यूचे रुग्ण आढळल्याची घटना नुकतीच उघडकीस आली आहे. यावरून मलेरिया आणि डेंग्यू रुग्णांची आणि डास निर्मितीची भयावह स्थिती स्पष्ट होत असल्याचे आमदार संजय केळकर यांनी सांगितले.

# सिंघानिया शाळेचा ऑनलाईन शिक्षणाचा निर्णय :१८ ते २८ जूनदरम्यान शाळा बंद मनसेच्या तक्रारीनंतर शाळा नरमली

**ठाणे** :- श्रीमती सुनितीदेवी सिंघानिया शाळेच्या लगत चालू असलेल्या बांधकामामुळे ४५ हून जास्त विद्यार्थी व ५ शिक्षक डेंग्यू, मलेरिया ने आजारी आहेत तसेच ११० हून जास्त जणांना ताप आलेला आहे. काहींची तब्येत जास्त खराब झाली आहे. जोपर्यंत योग्य उपाययोजना केल्या जात नाहीत तोपर्यंत शाळेत मुलांना बोलवू नये असे आदेश द्यावेत अशी मागणी मनविसेचे संदीप पाचंगे यांनी ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे १६ जून रोजी केली होती. प्रशासन आणि शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पालकांसोबत चर्चा करून व त्यांच्या सूचनेनुसार, नर्सरी ते दहावीपर्यंतच्या सर्व वर्गांसाठी १८ जून ते २८ जून २०२५ या कालावधीत शिक्षण पूर्णतः ऑनलाईन पद्धतीने घेण्याचा निर्णय शाळेने घेतला आहे.

या शाळेच्या आवारात एका नव्या इमारतीचे काम सुरू आहे. या बांधकामामुळे शाळेत डासांचा प्रादूर्भाव वाढला असून याचा त्रास विद्यार्थ्यांना होऊ लागला आहे. अर्धवट बांधकाम झालेल्या इमारतीत शाळा प्रशासनाकडून काही वर्ग भरवले जात होते. शाळेजवळ सुरू असलेल्या बांधकामामुळे परिसरात अस्वच्छता निर्माण झाली आहे. साचलेल्या पाण्यामुळे डासांचे प्रमाण प्रचंड वाढले असून त्यामुळे डेंग्यू व मलेरियाचा प्रादुर्भाव झाल्याचे पालकांच्या तक्रारी आल्या होत्या असे पाचंगे यांनी सांगितले. दरम्यान शाळा प्रशासनाने अगदी लहान वयाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणात अडचणी येऊ शकतात, हे लक्षात घेता नर्सरी, ज्युनिअर केजी व सीनिअर केजीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना ऑनलाईन वर्गात सहभागी न होता त्यांना सुट्टी देण्यात आली आहे. इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणारी युनिट टेस्ट सध्या पुढे ढकलण्यात आली असून, आता ती ३० जूनपासून घेण्यात येईल. नव्याने सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. इयत्ता पाचवीची युनिट टेस्ट सध्या रद्द करण्यात आली आहे. ३० जून २०२५ पासून सर्व विद्यार्थ्यांचा नियमित वर्गशिक्षण पुन्हा सुरू होणार असून, सर्व वर्ग जुन्या इमारतीत भरवले जातील. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या सर्व तयारी शाळा प्रशासनाकडून करण्यात येत असल्याचे शाळा प्रशासनाने पालकांना पत्राद्वारे कळविले आहे.

मनसेने या प्रश्नाबाबत आवाज उठवित शिक्षणाधिकाऱ्यांना कारवाई करण्यास भाग पाडले तर शाळा प्रशासनाने नमते घेत शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे पाचंगे यांनी सांगितले.

# गडचिरोली व पालघर जिल्ह्यात प्रत्येकी १ कोटी १० लाख वृक्ष लागवडीसाठी आराखडा तयार करा - वन मंत्री गणेश नाईक

**मुंबई** :- राज्यात यंदा ११ कोटी वृक्ष लागवड करण्यात येणार आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री यांनी गडचिरोली जिल्ह्यात १ कोटी १० लाख आणि पालघर जिल्ह्यात १ कोटी १० लाख वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट दिले आहे. हे दोन्ही उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वन विभागाने आराखडा तयार करून रोपे उपलब्ध होतील याची दक्षता घ्यावी, असे निर्देश वन मंत्री गणेश नाईक यांनी दिले.

वन मंत्री श्री. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात वन विभागाच्या विविध बैठका झाल्या. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. यावेळी बैठकीस वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक तथा वन बल प्रमुख शोमिता बिश्वास, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) श्रीनिवास राव, श्री. रामाराव, पालघरच्या जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड, अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंरक्षक नरेश झिरमुरे, मुख्य वन संरक्षक रविकिरण गोवेकर, उपसचिव विवेक होशिंग यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते. वन मंत्री गणेश नाईक म्हणाले की, गडचिरोली व पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात विकासकामे होत आहेत. ही कामे होत असताना जिल्ह्यातील वृक्ष संपदाही वाढली पाहिजे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आग्रही आहेत. त्यासाठी त्यांनी दोन्ही जिल्ह्यात प्रत्येकी १ कोटी १० लाख झाडे लावण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये साग, चंदन आदी झाडे लावण्यात यावीत. तसेच प्रत्येक वन परिक्षेत्रात १०० एकरावर साग व चंदनाची झाडे लावण्याचे नियोजन करण्यात यावे.

गडचिरोली व पालघर या दोन्ही जिल्ह्यात तसेच राज्यात ११ कोटी झाडे लावताना ती देशी असावीत याकडे लक्ष देण्यात यावे. तसेच एवढे मोठे उद्दिष्ट गाठण्यासाठी रोपे पुरविण्यासाठी वन विभागाच्या रोपवाटिका (नर्सरी) सक्षम करावे. गरज पडल्यास कृषि विद्यापीठे, खासगी नर्सरीचीही मदत घ्यावी. जांभूळ, वड, पिंपळ, बकुळी, प्राजक्त, बांबू, साग, चंदन आदी झाडे लावण्यात यावीत. ही झाडे किमान तीन वर्षे वयाची असतील याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले. पालघर जिल्ह्यातील वृक्षारोपणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी जागा शोधणे, रोपे निवडणे आदी कामे वेगाने करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

# लेखक प्रदीप कोकरे, कवी सुरेश सावंतांना साहित्य अकादमी पुरस्कार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले अभिनंदन

**मुंबई** :- साहित्य अकादमीच्या आज जाहीर झालेल्या प्रतिष्ठित पुरस्कारांमध्ये मराठी साहित्यातील दोन साहित्यिकांचा समावेश आहे. लेखक प्रदीप कोकरे यांच्या 'खोल खोल दुष्काळी डोळे' या कादंबरीला साहित्य अकादमी युवा पुरस्कार २०२५ तर कवी सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया' या कवितासंग्रहाला साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्काराबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोघा साहित्यिकांचे अभिनंदन केले आहे.

लेखक प्रदीप कोकरे यांच्या 'खोल खोल दुष्काळी डोळे' या कादंबरीने मराठी साहित्यातील युवा लेखकांच्या संवेदनशील आणि प्रभावी लेखनाची चुणूक दाखवली आहे. तर कवी सुरेश सावंत यांचा 'आभाळमाया' हा कवितासंग्रह बाल साहित्यातील त्यांच्या उत्कृष्ट योगदानाचा दाखला आहे.

मराठी साहित्याच्या क्षेत्रात मोलाची भर घालणाऱ्या प्रदीप कोकरे आणि सुरेश सावंत यांचे या यशाबद्दल मन:पूर्वक अभिनंदन करतानाच त्यांच्या साहित्य प्रवासाला यश मिळो, अशा शुभेच्छा उपमुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

# धनगर रत्न पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

## विविध क्षेत्रातील १० मान्यवरांचा धनगर रत्न पुरस्काराने सन्मान



**ठाणे :-** धनगर प्रतिष्ठान, ठाणे जिल्हा व धनगर प्रतिष्ठान महिला मंडळ यांच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त ठाणे महापालिका मुख्यालयातील कै नरेंद्र बल्लाळ सभागृह ठधनगररत्न पुरस्कारठ सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्र्या धनगर समाजातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाला खासदार नरेश म्हस्के,आमदार संजय केळकर,महावितरणचे संचालक मुरहरी केळे,उद्योजक संदेश कवितके,माजी नगरसेविका नंदिनी विचारे,कोकण विभागीय नागरी पगारदार सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या संचालक दर्शना योगेश जानकर,जेष्ठ पत्रकार सुभाष बोंद्रे,सुप्रसिद्ध शिल्पकार शरद मालणकर,समाजाचे जेष्ठ नेते बाबासाहेब दगडे,प्रतिष्ठानचे अध्यक्ष दीपक कुरकुंडे ,महिला मंडळाच्या अध्यक्ष माधवी बारगीर आदींसह मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते धनगर रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आले यामध्ये संदीप पांढरे (क्रीडा), डॉ अशोक माने ( वैद्यकीय), नीता राजेश वारे (शासकीय),विक्रांत समासे (उद्योजक),अखिलेश पाल ( सामाजिक ),प्रदीप शेंडगे (राजकीय), सुभाष बोंद्रे (पत्रकारिता), प्रदीप जानकर (शैक्षणिक), बिरू खांडेकर (कला) पुण्यश्लोक अहिल्यादेवी मित्र मंडळ, मुलुंड म्हाडा कॉलनी, मुंबई (सामाजिक संस्था) यांना पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला .समाजाचे जेष्ठ नेते बाबासाहेब दगडे,दर्शना योगेश जानकर,प्रमोद वाघमोडे, दादासाहेब कर्णावर,अप्पासाहेब शेळके,अनिल जरग व ठाण्यातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची मूर्ती साकारणारे शिल्पकार शरद मालणकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला .तसेच दहावी,बारावी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार देखील या कार्यक्रमात करण्यात आला. यावेळी खासदार नरेश म्हस्के यांनी अहिल्यादेवींच्या जीवनकार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपले विचार मांडले. ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावात जन्मलेल्या अहिल्याबाई एक सामान्य कुटुंबातील मुलगी होत्या. पण त्यांच्या विचारांची खोली, नेतृत्वाची ताकद आणि जनसेवेची निष्ठा इतकी महान होती, की त्या इतिहासात अजरामर झाल्या. मंदिरांचे जिर्णोद्धार, धर्मशाळा, अन्नछत्रं, पाणपोया यांची उभारणी हे केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक काम होते. त्या काळात इंदूरचं राज्य न्याय आणि समृद्धीचं प्रतीक बनलं. त्यांचा दरबार हा गरीब, महिलांनाही न्याय देणारा होता. तीनशे वर्षांपूर्वीचं त्यांच्या कृतीतून महिलांचे सशक्तीकरण घडलं होतं हे विशेष आहे. त्यांची दूरदृष्टी, नीतिमत्ता आणि कणखर नेतृत्व हे आजच्या समाजासाठी आणि विशेषत: महिलांसाठी एक प्रेरणास्त्रोत आहे.असे यावेळी म्हस्के म्हणाले. आमदार संजय केळकर यांनी देखीलआपल्या भाषणात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करताना सर्वांनीच अहिल्यादेवींच्या आदर्श घेतला पाहिजे असे सांगितले. अहिल्यादेवींनी देव,देश,धर्मासाठी अफाट असे काम केले हे काम देश परदेशात पोहचले पाहिजे इतके मोठे काम अहिल्यादेवी होळकर यांनी केले.३०० व्या जयंतीनिमित्ताने मी स्वता अहिल्यादेवी होळकर यांनी मराठवाड्यात बांधलेल्या अनेक मंदिरात जाऊन माथा टेकवत आहिल्यादेवींना नमन केल्याचं त्यांनी सांगितले.तसेच अहिल्यादेवी होळकर यांनी ज्या ज्याठिकाणी कामे केले आहेत त्याठिकाणी प्रतिष्ठानने नागरिकांना घेऊन जावे त्यासाठी आम्ही सहकार्य करू असे यावेळी केळकर म्हणाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्याध्यक्ष महेश गुंड,सचिव तुषार धायगुडे ,खजिनदार अनिल जरग,उपाध्यक्ष कुमार पळसे,राजेश वीरकर,प्रचारप्रमुख सचिन बुधे,उपखजिनदार सुरेश भांड,सल्लागार दिलीप कवितके, सूर्यकांत रायकर,मनोहर वीरकर,प्रसाद वारे,कार्यकारणी सदस्य गणेश बारगीर,अविनाश लबडे,राजेश वारे,दीपक झाडे,संतोष बुधे,संतोष दगडे,उत्तम यमगर,अंकुश उघाडे,प्रमोद वाघमोडे,उद्धव गावडे,महेश पळसे,अनिकेत पाडसे,आर्यन गुंड, साईबुधे,महिला मंडळाच्या उपाध्यक्ष संगीता खटावकर,सचिव गायत्री गुंड,खजिनदार भारती पिसे,उपसचिव सुजाता भांड,उपखजिनदार सुषमा बुधे यांनी मेहनत घेतली.



# महाराष्ट्र माथाडी व जनरल कामगार संघाच्या ठाणे-पालघर जिल्हाध्यक्षपदी संजय वाघुले यांची निवड

**ठाणे :-** भारतीय मजदूर संघाबरोबर संलग्न महाराष्ट्र माथाडी व जनरल कामगार संघाच्या ठाणे व पालघर जिल्हाध्यक्षपदी भाजपाचे माजी ज्येष्ठ नगरसेवक व माजी ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांची निवड करण्यात आली आहे. ठाण्यातील येऊर येथे नुकत्याच झालेल्या बैठकीत संजय वाघुले यांनी पदाची सूत्रे स्वीकारली.

या बैठकीत जिल्ह्यातील इतर पदाधिकाऱ्यांचीही निवड केल्यानंतर त्यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. महाराष्ट्र माथाडी व जनरल कामगार संघाच्या ठाणे-पालघर जिल्हा सरचिटणीसपदी सुप्रिम सुर्वे, ठाणे जिल्हा उपाध्यक्षपदी नरेंद्र राजाराम पाटील, सरचिटणीसपदी मुकेश मोकाशी, ठाणे-पालघर जिल्हा कार्याध्यक्षपदी अनिल कनौजिया यांची निवड करण्यात आली आहे. या वेळी संघाचे प्रदेश सरचिटणीस अरुण दळवी, कार्याध्यक्ष संदीप कदम, कायदेविषयक सल्लागार ॲड. के. पी. गुरव आदी मान्यवर उपस्थित होते.



ठाणे व पालघर जिल्ह्यासाठी नियुक्ती केलेले पदाधिकारी पुढीलप्रमाणे आहेत. ठाणे व पालघर जिल्हा कार्याध्यक्ष अनिल कनौजिया, जिल्हा उपाध्यक्ष मनोहर सुगदरे, जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र राजाराम पाटील, जिल्हा चिटणीस नयन पाटील, चिटणीस छगन भोसले, कल्याण, मुरबाड आणि शहापूर तालुका उपाध्यक्ष गणेश चिमा भोईर, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष प्रदेश शेडगे, उपाध्यक्ष राकेश चौगुले, उपाध्यक्ष किरण मणेरा, कळवा प्रभाग क्र. २३ सचिव संदीप वर्मा, माजिवडा-मानपाडा प्र. क्र. १ सचिव चेतन रमाकांत किणी, कळवा प्रभाग समिती विभाग अध्यक्ष तेजस चंद्रमोरे, कोपरी प्रभाग समिती विभाग अध्यक्ष नदीम कुरेशी, उथळसर प्र. क्र. १२ सचिव ऋषी वाघ, उथळसर प्र. क्र. १२ सहसचिव मयूर वायंगणकर, माजिवडा-मानपाडा प्र. क्र. १ उपाध्यक्ष अक्षय नागळकर, कळवा प्र. क्र. १३ उपाध्यक्ष करण गणेश पवार, उथळसर प्र. स. १२ सचिव अनिकेत तावडे, उथळसर प्र. स. १२ उपाध्यक्ष जितेंद्र विशे, लोकमान्य-सावरकर नगर प्रभाग अध्यक्ष गुलाब झा, माजिवडा-मानपाडा प्र. २ उपाध्यक्ष पंकज गोंधळे, माजिवडा-मानपाडा प्र. विभाग अध्यक्ष हर्षद सत्यवान पाटील, ठाणे शहर सचिव सचिन गणेश सावंत, उथळसर प्र. ११ उपाध्यक्ष परेश चव्हाण, ठाणे शहर सचिव निलेश रा. पाटील, ठाणे शहर उपाध्यक्ष संतोष साळुंखे, कोपरी प्रभाग समिती उपाध्यक्ष दीपक अशोक कदम, वर्तकनगर प्र. क्र. ५ सचिव संदेश बांबर्डेकर, उथळसर प्र. क्र. १२ उपाध्यक्ष गणेश खोपडे, वर्तकनगर प्र. क्र. ४ सचिव विश्राम बागवे, वर्तकनगर प्र. क्र. ४ उपाध्यक्ष सुहास बने, वर्तकनगर प्रभाग विभाग अध्यक्ष सचिन श्यामराव पवार, वर्तकनगर प्रभाग समिती सहसचिव महेश भिलारे, वर्तकनगर प्रभाग समिती उपाध्यक्ष समाधान साळवी, वर्तकनगर प्रभाग समिती ५ अध्यक्ष भगवान आडे, नवी मुंबई उपाध्यक्ष शरद तेवरे, उथळसर प्रभाग समिती १२ सहसचिव प्रशांत मोडके. या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना संजय वाघुले यांनी शुभेच्छा दिल्या.

# ठाण्यात रस्त्यावर सांडलेल्या चिखलाने अडवली वाहतूकीची वाट

**ठाणे :-** मुंबई-नाशिक वाहिनीवरील नितीन कंपनी उड्डाणपुलावर एका अज्ञात डंपरमधून मोठ्या प्रमाणात चिखल सांडल्याची बाब रविवारी सकाळी दहा ते सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास समोर आली. त्या सांडलेल्या चिखलाचा परिणाम मुंबईकडून नाशिककडे जाणऱ्या वाहतुकीवर झाल्याचे पाहण्यास मिळाले. यामुळे त्या वाहिनीवरील वाहतूक दोन तास धीम्या गतीने सुरू होती. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिली.



मुंबई नाशिक वाहिनी वरील नितीन कंपनी उड्डाणपुलावर मोठ्या प्रमाणात चिखल सांडल्याबाबत वाहतूक पोलिस कर्मचारी देसाई यांनी ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षेला दिली. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी वाहतूक पोलीस कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान आणि घनकचरा विभागाचे कर्मचारी यांनी धाव घेतली. रोडवरती पडलेला चिखल आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने जेसीबी मशीनद्वारे डंपरमध्ये भरून उचलण्यात आला. तसेच फायर वाहनांमधील जेट पाईपच्या साह्याने पाणी मारून चिखल पडलेला रोड स्वच्छ करण्यात आला. याचदरम्यान मुंबई नाशिक वाहिनीवरील वाहतूक सुमारे ०२ तास धीम्या गतीने सुरू होती. चिखल बाजूला करण्यात आल्यावर, मुंबई-नाशिक वाहिनीवरील वाहतूक सुरळीत झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.



# ठाण्यात वेश्याव्यवसाय करवून घेणाऱ्या दलालास अटक ; पीडित दोघांची सुटका

ठाणे: 'ऑनलाईन एस्कॉर्ट सर्व्हसच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करवून घेणऱया एक दलालला ठाणे शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली. तसेच त्याच्या तावडीतून दोन पीडित महिलांची सुटकाही करण्यात गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे.

ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत ऑनलाईन एस्कॉर्ट सर्व्हसच्या नावाखाली गुगलवर जाहीरात देवुन ग्राहकांना फोटो पाठवुन मुली पुरवित असल्याची बातमी ठाणे शहर पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या वरीष्ठ पोलिस निरीक्षक चेतना चौधरी यांना मिळाली होती. शुक्रवारी (ता.२०) ऑनलाईन दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क करून अटकेतील दलालाने ठ जुना आग्रा रोड येथील हॉटेल शिव वंदना इन लॉजिंग ॲन्ड बोर्डीगठ या ठिकाणी महिला पाठवित असल्याचे सांगितले. त्यानुसार त्या ठिकाणी छापा कारवाई करून दोन पिडीत महिलांची सुटका केली. तसेच लॉज मॅनेजर व दोन पाहीजे आरोपी या तिघांच्या विरूध्द नौपाडा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता अधिनियम २०२३ चे कलम १४३(१), १४३(३), ३(५) सह अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सन १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) अमरसिंह जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रतिबंध) विनय घारेपडे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक चेतना चौधरी, पोलिस उपनिरीक्षक स्नेहल शिंदे, सहायक पोलिस उपनिरीक्षक डी. के. वालगुडे, पोलिस हवालदार व्ही. आर. पाटील, आर.यु. सुवारे, के. बी. पाटील, पोलिस अमंलदार पी.जी. खरात, एच. आर. थोरात, शाहु पाटील या पथकाने केली.